लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM

शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३

# आज ‘लोकसत्ता लोकांकिका’ची ठाणे विभागीय अंतिम फेरी

## पाच महाविद्यालयांमध्ये लढत रंगणार; नेपथ्य, कसदार अभिनय, रंगतदार सादरीकरणाची पर्वणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** कलारसिकांच्या पसंतीस उतरावी आणि परीक्षकांची मने जिंकावी, यासाठी गेला दीड महिना कसून सराव करीत पाच महाविद्यालये ‘लोकसत्ता लोकांकिका’च्या ठाणे विभागीय अंतिम फेरीत पोहोचली आहेत. अशा भारलेल्या वातावरणात ‘लोकांकिके’ची अंतिम फेरी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे आज पार पडणार आहे.

विभागीय प्राथमिक फेरीत दर्जेदार सादरीकरण हे लक्ष्य विद्यार्थ्यांनी ठेवले होते. ते साध्य करताना अव्वल ठरलेली पाच महाविद्यालये विभागीय आज अंतिम फेरीत लढत देणार आहेत. सामाजिक विषय मनोरंजक पद्धतीने मांडताना कसदार अभिनयाची झलक पाहायला मिळणार आहे.

नाट्यसंहिता, दिग्दर्शनकलेचा उच्च बिंदू म्हणजे लोकांकिका ही प्रतिमा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात रुजली आहे. कलागुणांचा विकास आणि समृद्ध कलेला हक्काचे व्यासपीठ ‘लोकसत्ता लोकांकिका’च्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मिळाले आहे. लोकांकिकेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. ठाणे विभागातून ११ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. यात नावीन्यपूर्ण विषयांच्या मांडणीत दर्जेदार अभिनय आणि दिग्दर्शनाची साथ मिळाली. परीक्षकांच्या नियमांच्या कसोटीवर उतरत पाच महाविद्यालयांनी बाजी मारली.

एनकेटी महाविद्यालयाने सादर केलेली ‘अक्का स्पेशल’, जोशी बेडेकर महाविद्यालयाची ‘यात्रा’, सी. के. ठाकूर महाविद्यालयाने सादर केलेली ‘काक्षी’ अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाची ‘आई टायर्ड होतेय’ आणि ज्ञानसाधना महाविद्यालयाची ‘उणिवांची गोष्ट’ या एकांकिका ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आल्या आहेत.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांना सिने, नाट्य क्षेत्रात काम करण्याची संधीही मिळाली आहे. मान्यवरांचे मार्गदर्शन, चित्रपट-मालिका क्षेत्रात जाण्याची संधी आणि मान्यवर कलावंतांची अंतिम फेरीसाठी लाभणारी प्रमुख उपस्थिती अशा विविध कारणांमुळे लोकसत्ता लोकांकिका अत्यंत महत्वाची असते.

**अंतिम फेरी कुठे?**

राम गणेश गडकरी रंगायतन, ठाणे

**कधी आणि किती वाजता ?**

शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३

वेळ – दुपारी ३.४५ पासून

सॉफ्ट कॉर्नर प्रस्तुत लोकसत्ता लोकांकिका

ZEE टॉकीज

**प्रायोजक**

**मुख्य प्रायोजक**
- सॉफ्ट कॉर्नर

**सहप्रायोजक**
- झी टॉकीज
- भारती विद्यापीठ, पुणे
- शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचलित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट

**पॉवर्ड बाय**
- केसरी टूर्स
- शिवामृत दूध उत्पादक

**सहकारी**
संघ मर्या, विजयनगर-अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर
- श्री नेमिनाथ ज्वेलर्स
- एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

**साहाय्य**
- अस्तित्व

**टॅलेंट पार्टनर**
- आयरिस प्रॉडक्शन



ठाणे विभागातून महाअंतिम फेरीत धडक मारणाऱ्या 'ज्ञानसाधना'च्या 'उणिवांची गोष्ट' या एकांकिकेच्या चमूसह मान्यवर.

# 'ज्ञानसाधना'ची 'उणिवांची गोष्ट' महाअंतिम फेरीत

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : 'लोकसत्ता लोकांकिका' ठाणे विभागीय अंतिम फेरीत ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'उणिवांची गोष्ट' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावत महाअंतिम फेरीत प्रवेश केला.

'लोकसत्ता लोकांकिके'ची ठाणे विभागीय अंतिम फेरी शुक्रवारी संध्याकाळी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे मोठ्या उत्साहात पार पडली. तरुण रंगकर्मींच्या सादरीकरणाला ठाणेकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मनापासून दाद दिली. कलाकारांनी 'लोकसत्ता लोकांकिके'च्या मंचावरून कलेचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला.

जोशी- बेडेकर, ज्ञानसाधना आणि एनकेटी, वसई येथील अण्णा साहेब वर्तक आणि पनवेल येथील सी. के. ठाकूर या पाच महाविद्यालयांनी स्पर्धेमध्ये स्थान पटकावले होते.

ठाणे शहरासह इतर विविध शहरातून रसिक या स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या रसिक प्रेक्षकांसमोर कला सादर करण्याची संधी स्पर्धकांना मिळाली.

ठाण्यातील एनकेटी महाविद्यालयच्या ह्यअक्का स्पेशलह्न या एकांकिकेने स्पर्धेची सुरुवात झाली. त्यानंतर, ठाकूर महाविद्यालयाच्या 'काक्षी' या एकांकिकेने संवाद आणि नृत्यकौशल्याने रसिकांचे मन जिंकली. तर जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'यात्रा' या एकांकिकेच्या माध्यमातून आई आणि मुलाच्या नात्याचा प्रवास उलगडला.

वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाने मोबाइलच्या विश्वामुळे हरपलेला कौटुंबिक संवाद आणि त्यात, एकटी पडलेल्या गृहिणीच्या मनस्थितीवर भाष्य करणारी 'आई टायर्ड होतेय' ही एकांकिका सादर केली, तर अंध आणि मुक दाम्पत्याच्या संसारातील उणिवा आणि त्यांची एकमेकांना समजून घेण्याची धडपड 'उणिवांची गोष्ट' या एकांकिकेच्या माध्यमातून ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाने दाखवून दिले.

माजी महापौर नरेश म्हस्के, दिग्दर्शक विजु माने, अभिनेते कुशल बद्रिके, सुनील देवळेकर, ठाणे महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, निर्माता मंगेश देसाई, दिग्दर्शक प्रवीण तरडे, रवी गायकवाड, रमेश परदेसी, रामभाऊ म्हाळगी प्रबोधनी कार्यकारणी सदस्य सुजय पतकी आदी यावेळी उपस्थित होते.


सॉफ्ट कॉर्नर प्रस्तुत लोकसत्ता लोकांकिका

**मुख्य प्रायोजक**
- सॉफ्ट कॉर्नर

**सहप्रायोजक**
- झी टॉकीज
- भारती विद्यापीठ, पुणे
- शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचलित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँण्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट
- शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर- अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर
- श्री नेमिनाथ ज्वेलर्स
- एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

**पॉवर्ड बाय**
- केसरी टूर्स

**साहाय्य**
- अस्तित्व

**टॅलेंट पार्टनर**
- आयरिस प्रॉडक्शन


"नवीन पिढी आशय सांगू पाहते, मांडू पाहते हे खरंच कौतुकास्पद आहे. हौशी रंगमंच हे माझे श्रद्धास्थान आहे. मी १२ वर्ष हौशी रंगमंच केला. आपल्या मधली ऊर्जा वाढण्याचा बळ ही स्पर्धा देते. स्पर्धेत जिंकणे किंवा हरणे या पेक्षा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. कारण प्रयत्नांनाच पुढे यश येते. प्रयत्न न करता यश मिळणे हे अलीकडच्या काळात जास्त व्यासपीठे निर्माण झाल्याने सोपे झाले आहे. खऱ्या अर्थाने परिश्रम आणि रंगमंचीय अवकाशाचा वापर करण्याची संधी, आपल्या अंगभूत आविष्कारां वापर करण्याची संधी या निमित्ताने तरुण पिढीला मिळत आहे. - **मकरंद अनासपुरे**, अभिनेते

"लोकांकिका सारख्या व्यासपीठावर येऊन आपले कथन मांडणे आणि ताकदीने मांडणे कौतुकास्पद आहे. इतक्या लोकांचे काम पाहून आपल्याला देखील काही तरी शिकायला मिळते. - **अमित राय**, लेखक, दिग्दर्शक

"लोकसत्ता लोकांकिकेला दरवर्षी मी वेगवेगळ्या विभागात उपस्थित राहतो. एकांकिकेचा दर्जा उंचावत चालला आहे. यंदाच्याही सर्व एकांकिका उत्तम होत्या. - **दिलीप कुलकर्णी**, सॉफ्ट कॉर्नर

**प्रथम पारितोषिक**
उणिवांची गोष्ट- ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

**द्वितीय पारितोषिक**
काक्षी- सी. के. टी. महाविद्यालय, पनवेल

**तृतीय पारितोषिक**
यात्रा- जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

**दिग्दर्शक**
अभिजीत झुंजारराव (काक्षी)

**लेखक**
नितीन सावळे / अजय पाटील, (उणिवांची गोष्ट)

**अभिनय**
सानिका देवळेकर, (उणिवांची गोष्ट)
श्रावणी खानविलकर,( यात्रा)
साईराज घोलप, (यात्रा)
प्रगती निखारे, (अक्का स्पेशल)

**नेपथ्यकार**
सिद्धेश नांदलस्कर, (उणिवांची गोष्ट)

**संगीत**
आशुतोष वाघमारे, (काक्षी)

**प्रकाशयोजना**
श्याम चव्हाण, (काक्षी)



पनवेलच्या सी.के. टी महाविद्यालयाची एकांकिका 'काक्षी'ने 'लोकसत्ता लोकांकिका' ठाणे विभागीय अंतिम फेरीत द्वितीय क्रमांक पटकावला.

# नवोन्मेषाचा आविष्कार

## 'लोकसत्ता लोकांकिका'मधील अभिनय, लेखन, दिग्दर्शनाला प्रेक्षकांची दाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** 'लोकसत्ता लोकांकिका'ची ठाणे विभागीय अंतिम फेरी ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये शुक्रवारी रंगली. प्राथमिक फेरीत परीक्षकांनी केलेल्या सूचनांचा सखोल अभ्यास करून सुधारत कलाकारांनी नवनव्या कलाजाणीवांचा नाट्याविष्कार सादर केला. ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'उणिवांची गोष्ट' या एकांकिकेने ठाणे विभागीय अंतिम फेरीत प्रथम क्रमांक पटकावत महाअंतिम फेरीत प्रवेश केला.

राज्यस्तरीय 'लोकसत्ता लोकांकिका' या स्पर्धेची ऑक्टोबरच्या अखेरीस घोषणा झाली. अभिनय, लेखन आणि दिग्दर्शन या क्षेत्रात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कला सादर करण्यासाठी माध्यमातून हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत असते. त्यामुळे कलाप्रेमी विद्यार्थी या स्पर्धेची आतुरतेने वाट पाहत असतात. यंदाही ठाणे विभागातून विविध महाविद्यालयांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्यात ठाणे, कल्याण, उल्हासनगर, बदलापूर, भाईंदर, पनवेल, वसई आणि विरार येथील ११ महाविद्यालयांचा समावेश होता. दोन टप्प्यांत प्राथमिक फेरी पार पडली होती. यातून, पाच महाविद्यालयांची परीक्षकांनी विभागीय अंतिम फेरीसाठी निवड केली. त्यात ठाणे शहरातील जोशी-बेडेकर, ज्ञानसाधना आणि एनकेटी, वसई येथील अण्णासाहेब वर्तक आणि पनवेल येथील सी. के. ठाकूर या महाविद्यालयांचा समावेश होता.

सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
लोकसत्ता
लोकांकिका
ZEE टॉकीज
BHARATI VIDYAPEETH

### प्रायोजक

**मुख्य प्रायोजक**
- सॉफ्ट कॉर्नर

**सहप्रायोजक**
- झी टॉकीज
- भारती विद्यापीठ, पुणे
- शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचलित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ॲण्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट

**पॉवर्ड बाय**
- केसरी टूर्स
- शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर-अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर
- श्री नेमिनाथ ज्वेलर्स
- एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

**साहाय्य**
- अस्तित्व

**टॅलेंट पार्टनर**
- आयरिस प्रॉडक्शन



'लोकसत्ता लोकांकिका' ठाणे विभागीय अंतिम फेरीत ठाण्याच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाची 'यात्रा' ही एकांकिका तृतीय विजेती ठरली.

लोकसत्ता दि. 16/12/2023

# ‘महाराष्ट्राच्या लोकांकिके’चे मानकरी कोण?

## महाअंतिम फेरीत आज आठ नाट्यसंघांमध्ये चुरस; अभिनेते सौरभ शुक्ला यांची प्रमुख उपस्थिती



लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : जवळपास महिनाभरापासून रंगलेल्या ‘लोकसत्ता लोकांकिका’ या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी आज, शनिवारी माटुंग्यातील यशवंत नाट्यगृहात होणार आहे. महाअंतिम फेरीत आठ नाट्यसंघांतील चुरस सकाळी ९.१५ पासून रंगणार असून, तरुणाईच्या या रंगमंचीय आविष्काराला दाद देण्यासाठी प्रसिद्ध अभिनेते सौरभ शुक्ला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेसाठी नवीन आणि उत्कृष्ट संहितेच्या तयारीपासून ते गेल्या महिन्याभरातील तालमींपर्यंत तरुण रंगकर्मींनी कौशल्य पणाला लावले आहे. आता महाअंतिम फेरीत सर्वोत्कृष्ट ठरून ‘महाराष्ट्राची लोकांकिका’ हा बहुमान मिळवण्यासाठी (पान ४ वर)


सॉफ्ट कॉर्नर
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
ZEE टॉकीज

मुख्य प्रायोजक
● सॉफ्ट कॉर्नर

सहप्रायोजक
● झी टॉकीज
● भारती विद्यापीठ, पुणे
● शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचलित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ॲण्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट
● शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर-अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर
● श्री नेमिनाथ ज्वेलर्स
● एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च

पॉवर्ड बाय
● केसरी टूर्स

साहाय्य
● अस्तित्व

टॅलेंट पार्टनर
● आयरिस प्रॉडक्शन


### मकरंद देशपांडे यांच्या नाटकाची झलक



प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक मकरंद देशपांडे यांच्या ‘मनुष्य’ या नव्या नाटकातील नाट्यप्रवेश हेही या सोहळ्याचे खास आकर्षण आहे. मकरंद देशपांडे लिखित ‘मनुष्य’ या नाटकाचे तीन नाट्यप्रवेश आकांक्षा गाडे, आशिष गाडे, इशा डे, हिमांगी शुक्ला आणि सुशील आदी कलाकार ‘लोकसत्ता लोकांकिका’ महाअंतिम सोहळ्याच्या मंचावर सादर करणार आहेत.

महाअंतिम फेरीत दाखल झालेल

ठाणेवैभव ४ ठाणे, बुधवार २७ डिसेंबर २०२३



# ज्ञानसाधनात प्राध्यापकांनी घेतल्या उत्तम आरोग्याच्या टीप्स

**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील प्राध्यापक मंच आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने अ होलिस्टिक वे टू मॅनेज मेंटल हेल्थ अँड स्ट्रेस इन लाईफ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन ए.व्ही.रुम येथे करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख वक्ते डॉ. अनिल गार्ग आणि योग अभ्यासक पल्लवी पाटील उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे स्वयं अर्थसाह्यक विभागाचे उप प्राचार्य अॅड.सुयश प्रधान, उपप्राचार्य सीताराम वाहुळे, प्रशासकीय उपप्राचार्य दिनेश जोशी यांच्या हस्ते डॉ.अनिल गार्ग यांचे सरस्वती चिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी अनिल गार्ग यांनी माणसाला ताणतणाव का येतो, कसा येतो, केव्हा येतो आणि ताण घेण्याची कारणे कोणती, त्याचा मानवी शरीरावर, मनावर कोणते परिणाम होतात हे प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सविस्तर माहिती सांगितली. माणसाने आपल्या जीवनात कोणत्याही प्रकारचे ताण, टेन्शन घेऊ नये. कारण आपण जन्माला आलो तेव्हा फक्त शरीर, मन, श्वास, आत्मा या चार गोष्टी घेऊन आलो आहे.त्यामुळे आपल्याला मिळालेले जीवन हे बिनधास्त दिल खुलासपणे जगा, कुठल्याही गोष्टीचे टेन्शन घेऊ नका, चिंता करु नका, मनावर कुठल्याच कामाचा ताण घेऊ नका. कारण ताण निर्माण होण्याला आपणच कारणीभूत असतो असे ते म्हणाले.

योगतज्ज्ञ पल्लवी पाटील यांनी मेडिटेशन, ओमकार आणि व्यायामाचे, योगाचे वेगवेगळे प्रकारही यावेळी प्रात्यक्षिकासह करून घेतले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य सिताराम वाहुळे, प्रशासकीय उपप्रचार्य दिनेश जोशी, पर्यवेक्षक प्राध्यापक राजेंद्र वेखंडे, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि लेफ्टनंट दिलीप वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेनेचे एकूण 31 कॅडेट्स सदर सेशनमध्ये उपस्थित होते.

महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरें यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होत. या कार्यक्रमाच्या नियोजनात प्राध्यापक मंचप्रमुख धनंजय ठाकूर आणि त्यांची टीम यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रुचिता वनमाळी यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय व आभार प्रदर्शन प्रा.करिष्मा तळेकर-साटम यांनी केले.

पुढारी

ठाणे, मंगळवार, २ जानेवारी २०२४

पान १ वरून

# 'पुढारी'चे पुढारपण समाजहिताचेच!

करणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी सन्मान सोहळा आयोजित केला आहे. हे मोठे काम आहे. आम्ही महाराष्ट्र नंबर वन करत आहोत आणि पुढारीने महाराष्ट्रासाठी समाज उन्नतीचे काम केले आहे. जे नोकरी मागण्यापेक्षा नोकऱ्या देणारे झाले आहेत, त्यांचा मला अभिमान आहे, असे सांगताना मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आज जगभरात भारताचा जो डंका होतो आहे, तो नरेंद्र मोदींसारख्या नेतृत्वामुळे होत आहे. समाजामध्ये नवा विचार देणे आणि समाज सजग करणे हे काम वृत्तपत्र करतात तसे नेतृत्वही करत असते. म्हणून या कामाला आपण अधिक महत्त्व दिले पाहिजे.
काम कसं करावं याचे उत्तम उदाहरण नारायणराव राणे यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात करून दाखवले. आम्ही त्या काळात ठाण्याची घरे वाचवण्यासाठी त्यांच्याकडे गेलो होते. चार चार पाच पाच मजली इमारती तोडण्याच्या नोटिसा दिल्या होत्या. टी. चंद्रशेखर त्यावेळी महापालिकेचे आयुक्त होते. त्यावेळी आम्ही जुन्या इमारती तोडू नका म्हणून सांगण्यासाठी आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली गेलो होतो. त्यावेळी राणेसाहेबांनी आम्हाला विचारले, जुन्या इमारती पडल्या, लोकांचे जीव गेले तर काय करायचे, त्यावेळी दिघे साहेबांनी शब्द दिला, ज्या इमारती उत्तम आहेत, त्या वाचाव्यात अशी भूमिका घेतली आणि राणेसाहेबांनी ती मान्य केली. त्या एका रात्रीमध्ये आम्ही तो आदेश घेऊन आलो आणि त्यांची घरे वाचवली. नारायण राणे यांनी मुख्यमंत्री म्हणून यशस्वी काम केले. तसेच विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी उत्तम काम केले. सरकारने चांगले काम केले तर चांगले म्हणण्याची त्यांनी भूमिका घेतली. आजकाल हे दुर्मीळ आहे. असे सांगताना, नारायण राणे यांच्या कारकिर्दीचा मुख्यमंत्र्यांनी गौरव केला.
नव्या वर्षात आम्ही स्वच्छतेचा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये पुढारीने पुढाकार घ्यावा. ठाण्यापासून ही मोहीम आम्ही सुरू केली आहे. हे काम अविरत सुरू राहणार आहे. आज पुढारीच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने पुढारीच्या कामाचाही गौरव करतो. ग. गो. जाधव, प्रतापसिंह जाधव या सर्वांना धन्यवाद देतो. असे सांगत पुढारीने ज्यांचा गौरव केला त्या गौरवमूर्तींचेही मी अभिनंदन करतो. असे सांगत त्यांनी या कार्यक्रमाला विशेष धन्यवाद दिले.
यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कला, क्रीडा, साहित्य, सामाजिक, प्रशासन अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या युवांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यात प्रामुख्याने प्रशासनातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांचा विशेष सन्मान करण्यात आल, तर ठाणे पुढारी आवृत्तीचे मुख्य प्रतिनिधी दिलीप शिंदे, रायगड आवृत्ती ब्युरो चिफ जयंत धुळप यांचाही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार दिलीप शिंदे यांनी मानले.



ठाणे : दै. पुढारीच्या वर्धापन दिन सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यात रंगलेली चर्चा

## आमचे ठाणे, सुंदर ठाणे

केंद्रीय मंत्री नारायणराव राणे यांनी ठाण्याचे मुख्यमंत्री असल्याचा उल्लेख केला होता. हा मुद्दा पकडून मुख्यमंत्री म्हणाले, नारायणराव ठाण्याचा विकास आणि आमचे ठाणे सुंदर ठाणे हा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे. मी ठाण्याचा आहे, याचा मला अभिमान आहे. या कोकणच्या विकासामध्ये आम्ही राज्य सरकार म्हणून पुढाकार घेत आहोत. तुमच्याही खात्याकडून तुम्ही पुढाकार घेत आहात. या कोकणला आपण विकासाची नवी दिशा देऊ.

## आजी-माजी मुख्यमंत्र्यांची शाब्दिक फटकेबाजी

या कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शाब्दिक कोट्यांसह आपल्या भाषणात जोरदार फटकेबाजी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नारायण राणे यांचे कौतुक केल, तर नारायण राणे यांनी मुख्यमंत्र्यांमुळे कसा कोकण विकास होत आहे, याबद्दल आपली भूमिका मांडली. नारायणराव राणेंच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या कारकिर्दीवरून आताच्या विरोधी पक्षनेत्यांना मुख्यमंत्र्यांनी टोले लगावले, तर नारायण राणे यांनी नाव न घेता, उद्धव ठाकरेंना टोले लगावले.

## उत्कृष्ट पत्रकारांचा सन्मान

ठाणे, पालघर आणि रायगड आवृत्तीमधील उत्कृष्ट कामगिरी करणारे दैनिक पुढारीचे मुख्य वार्ताहर दिलीप शिंदे, रायगडचे विभागप्रमुख जयंत धुळप , ठाण्याचे प्रतिनिधी प्रवीण सोनावणे , उपसंपादक अमोल देशपांडे, जाहिरात विभागाचे रोहित साळुंखे, पालघरचे हनीफ शेख यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

2 JAN 2024

पुढारी

आयोजित

# Youth Icon 2024

सन्मान कर्तृत्वाचा...
कर्तृत्ववान युवाशक्तीचा



मानसी कमलेश प्रधान -सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय

# ज्ञानसाधना महाविद्यालयात रोजगार कार्यक्रम

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, शुभकुंदा प्रतिष्ठान यांच्या वतीने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने सुरू केलेल्या युवा रोजगार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम युवकांच्या हितासाठी व त्यांच्यातील रोजगारक्षमता वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला शुभकुंदा प्रतिष्ठानचे प्रतिनिधी प्रवीण नागरे, टीसीएसचे सतीश कालिदिंडी, समीर जैन, कमलेश प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे उपस्थित होते. ज्ञानसाधना महाविद्यालयातील सुमारे ३०० विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले होते.

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । गुरुवार, १८ जानेवारी २०२४




मनोरंजनविश्वात स्वतःची वेगळी ओळख प्रस्थापित करणारे अपूर्वा नेमळेकर, प्रथमेश परब आणि पृथ्विक प्रताप हे सगळ्यांचे लाडके कलाकार. त्यांचा अभिनयप्रवास, किस्से, आठवणी या साऱ्याविषयी ही लोकप्रिय कलाकार मंडळी 'मुंबई टाइम्स कार्निव्हल'मध्ये 'रंगवू या गप्पांची मैफल' या कार्यक्रमात व्यक्त होणार आहेत.

कधी : आज, १८ जानेवारी
वेळ : सकाळी १० .३० वाजता
कुठे : ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे (प.)

प्रवेश मर्यादित

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । शुक्रवार, १९ जानेवारी २०२४ ।

मुंबई TIMES ठाणे PLUS

मुंबई TIMES कार्निव्हल

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । शुक्रवार, १९ जानेवारी २०२४

गणेश जाधव, स्वप्नील शेजवळ






# ठाण्यात रंगली गप्पांची मैफल...

रूपेरी पडद्यावरील तारे-तारकांच्या आयुष्यातील यशाचा आलेख उलगडणाऱ्या गप्पांची मैफल 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'मुंबई टाइम्स कार्निव्हल'च्या निमित्ताने गुरुवारी ठाण्याच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजमध्ये रंगली. आगामी 'डिलिव्हरी बॉय' चित्रपटात मुख्य भूमिकेत असलेले प्रथमेश परब, पृथ्विक प्रताप आणि अंकिता लांडे पाटील यांनी अभिनय क्षेत्रातील त्यांच्या करिअरच्या सुरुवातीच्या दिवसांबाबत विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या, तर अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने तिच्या मुलाखतीतून संघर्ष, विविध भूमिका साकारताना पेललेली आव्हाने, सोशल मीडियावरील ट्रोलिंग अशा अनेक विषयांवर दिलखुलास गप्पा मारल्या. सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, संस्थेच्या सहसचिव मानसी कमलेश प्रधान यांच्यासह कॉलेजचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । बुधवार, २४ जानेवारी २०२४ । edit.mtonline.in

# 'दलित साहित्य हे आधुनिक भारतातील झंझावात'

## डॉ. प्रज्ञा दया पवार यांचे मत

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

'फुले, शाहू, आंबेडकर, गांधी, ताराबाई शिंदे यांसह अनेकांचे तत्त्वज्ञान आणि मानवी मूल्यातून दलित साहित्याची जमीन अधिक पूरक होत गेली. या साहित्याचा उगम ही क्रांतिकारी पर्वाची सुरुवात होती. दलित साहित्य म्हणजे आधुनिक भारतातील झंझावात असून, या साहित्याने देशातील सांस्कृतिक वर्चस्ववादाला थेट आव्हान दिले. यातूनच आंबेडकरी चळवळीला पोषक वातावरण निर्माण झाले', असे मत प्रसिद्ध लेखिका डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी व्यक्त केले.

मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था आणि मिती क्रिएशन्सतर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त साहित्य सेतू या उपक्रमांतर्गत 'दलित साहित्याचं योगदान' या विषयावर मंगळवारी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा माध्यम प्रायोजक आहे. कवयित्री, लेखिका डॉ. प्रज्ञा दया पवार, लेखिका शिल्पा कांबळे या चर्चासत्रात सहभागी झाल्या होत्या. डॉ. प्रियंवदा सावंत यांनी या लेखिकांशी मनमोकळा संवाद साधला.



महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

'महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे १९६०/६५नंतर दलित साहित्याचा उदय झाला असे मानले जाते. अवैदिक, चिकित्सक, बुद्धिप्रामाण्यवाद, भगिनीभाव यांमधून या साहित्याची पाळेमुळे शोधता येतील. बुद्धकाळापर्यंतही मागे जाता येते. थेरी गाथेतही या साहित्याचे संदर्भ सापडतात. प्रारंभी कवितांमधून दलित साहित्याचा ज्वालामुखी अवतरला. पुढे आत्मकथा/आत्मचरित्र आली. आपल्याकडील प्रस्थापित साहित्यात पारंपरिक आणि पांढरपेशी भाषेत अनुभव मांडताना मर्यादा येत होत्या. दलित साहित्याने स्वतःची स्वतंत्र भाषा निर्माण केली. पारंपरिक साहित्यात व्यक्तीचे खासगी आयुष्य भिरकवण्याची ताकद नव्हती. दलित साहित्याने सर्वसामान्य माणसालाही प्रथितयश लेखकासारखे लिहिता येऊ शकते, हा विश्वास दिला', असे डॉ. पवार यांनी नमूद केले. 'अभिजनवादी भाषेला दलित लेखकांनी प्रश्नांकित केले. बहुजनांची जगण्याची भाषा आपल्या साहित्यातून मुखर केली', असे त्या म्हणाल्या.

'आपल्या समाजात आजूबाजूला घडणारे भीषण जात वास्तव पाहत होते. ते बदलण्यासाठी लेखन हीच प्रेरणा होती', असे शिल्पा कांबळे यांनी सांगितले. 'दलित साहित्यात प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विद्रोह आणि नकार आहे. प्रस्थापित समीक्षेला आव्हान देणारे साहित्य दलित समाजातून निर्माण झाले. हे मानवमुक्तीचे साहित्य आहे. प्रसंगी त्यात भाषेची मोडतोड केली आहे. मात्र तळागाळातील माणसाच्या वेदना त्यामागील शब्दांतून उतरल्या आहेत. विषमतेला नकार हे मूल्य दलित साहित्य मानते. समानता, स्त्री मुक्ती, बुद्धाचे तत्त्वज्ञान, संविधान यांचे प्रतिबिंब दलित साहित्यात पानोपानी उमटत राहिले आहे. दलित साहित्यामुळे वाचकांना एक नवीन जग माहीत पडले. सवर्ण आणि प्रस्थापितांनी निर्माण केलेल्या जगाच्या पलीकडची दुनिया या साहित्याने दाखवली', असे त्या म्हणाल्या. 'वाट्याला आलेल्या तिरस्काराच्या विरुद्ध दलित लेखकांचे लिहिणे म्हणजे ही चळवळच आहे. लिहिणारे सर्व कार्यकर्तेच होते. आंबेडकरांच्या विचारांनी या लेखकांना ताकद दिली. त्यातून शैली, अभिव्यक्ती आणि भिडस्तपणा आंबेडकरी साहित्यात आला', असे त्यांनी स्पष्ट केले.

### आजचा कार्यक्रम

**वेळ :** सायं. ४ ते ५
**विषय :** विज्ञान साहित्य (चर्चासत्र)
**सहभाग :** डॉ. बाळ फोंडके, सुबोध जावडेकर, आनंद घैसास
**सूत्रसंचालन :** प्रियंवदा सावंत

महाराष्ट्र टाइम्स -
दि. ७ जून २०२३.

# दहावीनंतरच्या करिअर संधी; ठाण्यात आज मार्गदर्शन

## अनुभवी करिअरतज्ज्ञ करणार विद्यार्थ्यांचे शंकासमाधान

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** दहावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांचा करिअर निवडीचा मार्ग अधिक सोपा व्हावा, या उद्देशाने 'महाराष्ट्र टाइम्स'ने 'प्लॅनेट कॅम्पस' या उपक्रमांतर्गत आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने ठाण्यात आज करिअर मार्गदर्शन सेमिनार आयोजित केला आहे.

स्वाती साळुंखे दहावीनंतर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स शाखेतील संधींविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तर आनंद मापुस्कर हे विविध पदविका अभ्यासक्रम तसेच कौशल्य विकासामधील संधींबाबतची माहिती विद्यार्थ्यांना देतील. विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधानही करून घेता येईल. उज्वल भविष्याच्या दृष्टीने कोणते पर्याय उपलब्ध आहेत याविषयीचे मार्गदर्शन या सेमिनारमध्ये मिळणार असल्याने विद्यार्थी, पालकांनी या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश भगुरे यांनी केले आहे.



**स्वाती साळुंखे**
(आर्ट्स, कॉमर्स, सायन्स शाखेतील संधी)



**आनंद मापुस्कर**
(विविध पदविका अभ्यासक्रम तसेच कौशल्य विकासातील संधी)



**प्रा. रमेश देशपांडे**
(अकरावी ऑनलाइन प्रवेशाविषयी मार्गदर्शन)

**कधी व कुठे**

दिनांक :
आज, ७ जून, २०२३
वेळ : सकाळी ११ वाजता

स्थळ : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, जनकवी पी. सावळाराम सभागृह, ठाणे पश्चिम

महाराष्ट्र टाइम्स
दि. ७ जून २०२३

महाराष्ट्र टाइम्स
PLANET CAMPUS
उज्ज्वल भविष्यासाठी

# दहावीनंतरच्या करिअर संधी



दहावीच्या निकालानंतर आता कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा याविषयी विद्यार्थी, पालकांच्या मनात शंका आहेत. तुमच्या मनातील याच प्रश्नांचे समाधान करण्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'ने 'प्लॅनेट कॅम्पस' या उपक्रमांतर्गत अनुभवी करिअर मार्गदर्शकांच्या सहकार्याने ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात करिअर सेमिनारचे आयोजन केले आहे. **आज, ७ जून रोजी** होणाऱ्या या सेमिनारमध्ये स्वाती साळुंखे दहावीनंतर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स शाखेतील संधींविषयी मार्गदर्शन करणार आहेत. आनंद मापुस्कर हे विविध पदविका अभ्यासक्रम तसेच कौशल्य विकासामधील संधींबाबत माहिती देतील. अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावलेले प्रा. रमेश देशपांडे यंदाच्या प्रवेश प्रक्रियेतील बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगतील.



स्वाती साळुंखे
(आर्ट्स, कॉमर्स, सायन्स शाखेतील संधी)



आनंद मापुस्कर
(विविध पदविका अभ्यासक्रम तसेच कौशल्य विकासातील संधी)



प्रा. रमेश देशपांडे
(अकरावी ऑनलाइन प्रवेशाविषयी मार्गदर्शन)

**कधी व कुठे**

**दिनांक :** आज, बुधवार, ७ जून, २०२३
**वेळ :** स. ११ वाजता

**स्थळ :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, जनकवी पी. सावळाराम सभागृह, ठाणे पश्चिम

(सेमिनार विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य)

महाराष्ट्र टाइम्स

दि. ८/६/२०२३.

गणेश जाधव





# करिअर निवडीची गुरुकिल्ली

दहावीचा निकाल नुकताच लागला. दहावी उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालक यांची आता धावपळ सुरू होईल ती पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी. या संदर्भात त्यांना योग्य मार्गदर्शन व्हावे, या हेतूने 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस'च्या वतीने बुधवारी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात करिअर सेमिनार आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थी व पालकांचा उदंड प्रतिसाद त्यास मिळाला. आनंद मापुस्कर, स्वाती साळुंखे, प्रा. रमेश देशपांडे यांनी करिअर निवडीची गुरूकिल्ली यावेळी विद्यार्थी, पालकांच्या हाती ठेवली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे हे देखील यावेळी उपस्थित होते. ➤वृत्त...२

महाराष्ट्र टाइम्स

दि. ८/६/२०२३.

गणेश जाधव






# करिअर निवडीची गुरुकिल्ली

दहावीचा निकाल नुकताच लागला. दहावी उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालक यांची आता धावपळ सुरू होईल ती पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी. या संदर्भात त्यांना योग्य मार्गदर्शन व्हावे, या हेतूने 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस'च्या वतीने बुधवारी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात करिअर सेमिनार आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थी व पालकांचा उदंड प्रतिसाद त्यास मिळाला. आनंद मापुस्कर, स्वाती साळुंखे, प्रा. रमेश देशपांडे यांनी करिअर निवडीची गुरूकिल्ली यावेळी विद्यार्थी, पालकांच्या हाती ठेवली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे हे देखील यावेळी उपस्थित होते. ➤ वृत्त...२

महाराष्ट्र टाइम्स
दि: ८।६।२०२३

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

# करिअर निवडीची 'गुरूकिल्ली'

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

**दहावीनंतर करिअरच्या वाटा शोधत असताना बहुतांशी विद्यार्थी पालक संभ्रमात असतात. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतून करिअर निवडावे की आयटीआय अथवा इतर अभ्यासक्रम निवडावा, स्पेस सायन्स अथवा बायो टेक्नॉलॉजीसाठी मुंबई-ठाण्यात कितपत वाव आहे, या साऱ्या शंकाचे बुधवारी निरसन झाले. 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस'तर्फे ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या करिअर सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. करिअर मार्गदर्शक आनंद मापुस्कर, स्वाती साळुंखे आणि प्रा. रमेश देशपांडे यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांच्या मनातील संभ्रम दूर केला.**

अकरावी प्रवेश हा विद्यार्थ्यांच्या करिअरचा पाया असतो. शालेय शिक्षण संपवून विद्यार्थी करिअरच्या दिशेने पहिले पाऊल टाकत असताना अकरावीसाठी कोणतीही स्ट्रीम निवडावी यासाठी आकलन क्षमता, विषयाची आवड आणि बुद्धिमत्ता यांचा विचार पालकांनी करणे आवश्यक आहे. 'करिअर निवडत असताना केवळ थेरॉटिकल म्हणजे बी. ए, बी. कॉम शिक्षण पूर्ण करायचे आणि पुढे नोकरी करायची हे थांबवले पाहिजे. शिक्षण पूर्ण करण्यात खूप वर्षे खर्ची पडतात, तेही तितके गरजेचे आहे का? याचा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. यासाठी कौशल्य विकसित करायला हवे. कौशल्याधारित शिक्षणावरही विद्यार्थ्यांनी भर दिला पाहिजे, असे मापुस्कर यांनी सांगितले. विविध पदविका अभ्यासक्रम तसेच कौशल्य विकासातील संधी या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

'एखादी शाखा निवडत असताना त्या विद्यार्थ्याला त्या विषयाबदलची आवड आणि चिकाटी असेल तर निवडावे, असा सल्ला स्वाती साळुंखे यांनी दिला. आर्ट्स, कॉमर्स, सायन्स शाखेतील संधी यावर त्यांनी मार्गदर्शन केले. कलाशाखा म्हणजे कमी गुण किंवा गणित आणि विज्ञान जमत नाही म्हणून कला घेतले असे मानले जाते;

**'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस' सेमिनार**



### महत्त्वाची माहिती मिळाली...

या करिअर मार्गदर्शन सेमिनारमुळे करिअर निवडण्यासाठी मदत झाली. यातून करिअरविषयक चांगली माहिती मिळाली, अशी प्रतिक्रिया मोहित जाधव या विद्यार्थ्याने दिली. तर, माझ्या मुलाने कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा याबाबत या कार्यक्रमातून आम्हाला चांगले मार्गदर्शन मिळाले. तज्ज्ञांनी कमी वेळेत खूप महत्त्वाची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी मी वसईहून आले होते, असे सुचेता सोनावळे यांनी सांगितले.

**" हा अभिनव उपक्रम विद्यार्थ्यांना करिअर निवडण्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि पालकांचा करिअर निवडीबाबत असलेला संभ्रम दूर झाला. ज्या पालकांची मुले यंदा दहावीत आहेत, अशा पालकांनीही या सेमिनारमध्ये सहभाग घेतला होता.**

**डॉ. गणेश भगुरे, प्राचार्य, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे**

केले. अकरावीसाठी प्रवेश अर्ज भरल्यानंतर शाखा, महाविद्यालय निवड, वैज्ञानिक आरक्षण, समांतर आरक्षण, अल्पसंख्याक कोटा, व्यवस्थापन कोटा, इन-हाउस कोटा, दिव्यांग कोटा याविषयी माहिती देत त्यांनी उपस्थितांच्या शंकाचे निरसन

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । गुरुवार, १५ जून २०२३

# 'करिअर कशात करायचे, हे ठरवा'

म. टा. प्रतिनिधी, ठाणे



'आर्ट्स, कॉमर्स, सायन्स यापैकी एखादी शाखा निवडत असताना विद्यार्थ्याची विषयाबद्दलची आवड आणि चिकाटी लक्षात घ्यावी. आर्ट्स म्हणजे कमी गुण किंवा गणित आणि सायन्स जमत नाही म्हणून निवडलेला पर्याय, असा एक समज आहे. परंतु ते एक व्यापक क्षेत्र आहे,' असे मार्गदर्शन करिअर मार्गदर्शक स्वाती साळुंखे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस'च्या वतीने ठाण्याच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजमध्ये आयोजित करिअर सेमिनारदरम्यान मांडले. 'तुम्हाला नक्की कशात करिअर करायचे आहे, ते आधी ठरवा,' असा कानमंत्रही त्यांनी दिला.

दहावीनंतरच्या आर्ट्स, कॉमर्स, सायन्स शाखांतील संधी, याविषयी स्वाती साळुंखे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्या गेली २३ वर्षे विद्यार्थ्यांच्या करिअर मार्गदर्शन क्षेत्रात कार्यरत आहेत. 'आर्ट्सकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांना लिखाणाची आवड असल्यास त्या क्षेत्रात करिअर करता येईल. या माध्यमातून सध्याच्या ओटीटीच्या जगतात वेबसीरिज भाषांतरित करण्याच्या नव्या संधीही उपलब्ध आहेत. आर्ट्स शाखेत खूप अभ्यास करावा लागतो,' असे त्यांनी अधोरेखित केले. 'आजमितीस केवळ बँकिंगसाठी कॉमर्सचा पर्याय उरलेला नाही. बीकॉम, बॅफ अशा संधींतून करिअर घडवता येते,' असेही त्या म्हणाल्या.

## सायन्सला सर्वांचीच पसंती

'सायन्स प्रत्येकाचाच आवडता विषय असून इंजिनीअरिंग असो अथवा मेडिकलच्या संधी या सगळ्यासाठी या शाखेकडे पाहिले जाते. मात्र यासोबतच पॅरामेडिकल, नॅचरोथेरपी, डेण्टीस्ट्री, अॅग्रिकल्चरल अशा अनेक क्षेत्रांत या माध्यमातून संधी निर्माण होतात,' असे साळुंखे यांनी नमूद केले. तसेच या शाखेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा फिजिक्सचा पाया मजबूत असणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

## 'बॅकअप प्लॅन' आवश्यक

'कोणत्याही शाखेत करिअर करताना योग्य निर्णय आवश्यक असतो. यासोबतच प्रत्येक विद्यार्थ्यांचा बॅकअप प्लॅनही तयार असावा, अन्यथा करिअरदरम्यान अडचणी उद्भवतात,' असा सल्ला साळुंखे यांनी दिला.

## ...म्हणून दहावीचे गुण महत्त्वाचे

'जीवनात दहावीच्या गुणांचे फार महत्त्व नसते, असे वारंवार सांगितले जाते. मात्र अकरावीच्या प्रवेशासाठी दहावीचेच गुण ग्राह्य धरतात. त्यामुळे दहावीच्या गुणांना मोठी किंमत असते,' असेही साळुंखे म्हणाल्या.

**'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस' उपक्रमांतर्गत आयोजित सेमिनारमध्ये करिअर मार्गदर्शक स्वाती साळुंखे यांनी दहावीनंतर आर्ट्स, कॉमर्स, सायन्स शाखांतील विविध संधींविषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तर आनंद मापुस्कर यांनी विविध पदविका अभ्यासक्रमांसह कौशल्य विकास अभ्यासक्रमांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

# 'कौशल्य विकसित करा'

म. टा. प्रतिनिधी, ठाणे



'करिअर निवडताना केवळ थेरॉटिकल म्हणजे बीए, बीकॉम, शिक्षण पूर्ण करायचे आणि नोकरी करायची हे थांबवले पाहिजे. शिक्षण घेण्यात आपण खूप वर्षे घेतो, तितकी गरजेची आहेत का, याचा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. यासाठी कौशल्य विकसित करायला हवे. तसेच कौशल्य शिक्षणावर विद्यार्थ्यांनी भर दिला पाहिजे,' असा कानमंत्र करिअर मार्गदर्शक आनंद मापुस्कर यांनी दिला. 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस'च्या वतीने ठाण्याच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजमध्ये आयोजित करिअर सेमिनारदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांसह पालकांना मार्गदर्शन केले. या सेमिनारला विद्यार्थी, पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दहावीनंतर विविध पदविका अभ्यासक्रम, तसेच कौशल्य विकासातील संधी याविषयी आनंद मापुस्कर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. 'कौशल्य विकासाकडे बघण्याचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांसह पालकांनी बदलला पाहिजे. आजमितीस सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. या नोकऱ्यांसाठी बाह्य यंत्रणांकडून भरती केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासाचा मार्ग निवडावा,' असे आवाहन त्यांनी केले. 'मराठी वाङ्मय क्षेत्रात मुद्रितशोधन, स्तंभलेखन, संपादन, भाषांतर अशा संधी आहेत. तसेच आयटीआय करणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशात खूप मोठ्या संधी असून एसी दुरुस्ती, प्लम्बिंग अशा क्षेत्रांतही करिअर केल्यास उत्तम अर्थार्जन करता येईल,' असा सल्ला त्यांनी दिला. 'नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे शिक्षणामध्ये अनेक बदल होतील. हे धोरण आत्मसात करत असताना शिक्षकांचीही मानसिकता बदलायला हवी. कौशल्य विकासावर भर देताना नव्या शैक्षणिक धोरणामध्येही ऑन द जॉब ट्रेनिंग असले पाहिजे,' असे ते म्हणाले.

## शिकाऊ उमेदवारी योजना

'अॅप्रेंटिसशिप अर्थात शिकाऊ उमेदवारी योजनेसाठी www.apprenticeshipindia.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करावी. या ठिकाणी हजारो नोकरीच्या संधी विद्यार्थ्यांना मिळतात. तसेच केंद्र व राज्य सरकारकडून स्टायपेंड दिला जातो,' असेही मापुस्कर यांनी सांगितले.

## कलात्मक संधी

'चित्रकला चांगली असणाऱ्या विद्यार्थ्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स कॉलेजचा मार्ग निवडण्याआधी फाउंडेशन कोर्स केल्यास त्यांना निश्चितच फायदा होईल,' असे मापुस्कर यांनी अधोरेखित केले.

मुंबई, गुरुवार, दि. १५ जून २०२३

लोकमत मुंबई

# करिअरच्या संधी पाहूनच अभ्यासक्रमांची निवड

## विद्यार्थ्यांची पसंती आयटी, वाणिज्य आणि विज्ञान शाखेला

**प्रज्ञा म्हात्रे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** दहावीचा निकाल लागल्यानंतर आता अनेकांनी करिअरच्या दिशा ठरविण्याचे निश्चित केले आहे. आजूबाजूला करिअरच्या संधी पाहून यंदा शाखा निवडण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असल्याचे प्राचार्यांनी सांगितले. यंदा आयटी आणि अकौंट फायनान्समध्ये असलेल्या संधी पाहूनच वाणिज्य आणि विज्ञान शाखेकडे विद्यार्थी वळत असल्याचे निरीक्षण महाविद्यालयांनी नोंदविले.

दहावी, बारावीनंतर पुढे काय ? असा प्रश्न निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांना पडतो. याविषयी आपल्या पालकांशी, मार्गदर्शकांशी चर्चा करून करिअरची दिशा ठरवली जाते. यंदा मात्र विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रांत असलेल्या करिअरच्या संधी पाहूनच शाखा निवडण्याचे निश्चित केल्याचे प्राचार्यांनी सांगितले. यंदा आयटी क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा प्रचंड कल दिसत आहे. त्यामुळे विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन कॉम्प्युटर सायन्स निवडण्याकडे मुलांचा कल आहे. बँकिंग अँड इन्शुरन्स, अकाउंटिंग अँड फायनान्स, सीए या करिअरचा विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. ज्यांना या करिअरमध्ये रस आहे, ते वाणिज्य शाखेची निवड करत आहेत. गेल्यावर्षी सेल्फ फायनान्सकडे विद्यार्थ्यांचा कल होता. ज्यांना युपीएससी आणि सायकॉलॉजीमध्ये रस आहे, ते कला शाखेकडे वळतात; अशी माहिती जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी दिली.

१ बीएमएस, अकौंटिंग अँड फायनान्स, सीएस, आयटी हे अभ्यासक्रम विद्यार्थी वाणिज्य आणि विज्ञान शाखेकडे वळत असल्याचे सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी सांगितले.

२ गेल्या वर्षी ज्यांना बांदोडकर महाविद्यालयात कॉम्प्युटर सायन्सला प्रवेश मिळाला नाही, त्यांनी दुसरा अभ्यासक्रम निवडलाच नाही, अशी माहिती बांदोडकर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या क्षितिजा ढाकणे यांनी दिली.




### विद्यार्थ्यांमध्ये आयटी क्षेत्राची क्रेझ



■ कोरोनानंतर आयटी क्षेत्राची क्रेझ वाढू लागली आहे. यंदा मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा याच क्षेत्राकडे कल दिसून येत आहे. त्यामुळे विद्यार्थी विज्ञान शाखेकडे अधिक प्रवेश घेत आहेत, असे प्राचार्य संतोष गावडे यांनी सांगितले.

■ ज्या विद्यार्थ्यांना ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण आहेत, त्यातील अनेक विद्यार्थ्यांचे करिअर ठरलेले असते, ते विद्यार्थी आमच्याकडे मार्गदर्शनासाठी येत असतात आणि ज्यांचे करिअर सेट आहे ते पाहूनच ते शाखा निवडतात, असेही निदर्शनास आल्याचे गावडे यांनी सांगितले.

प्रहार मंगळवार, २७ जून २०२३

# ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे शुक्रवारी नवीन शिक्षण धोरणावर राष्ट्रीय परिषद

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याचे जाहीर केले आहे. या शैक्षणिक धोरणासंदर्भात शिक्षण संस्था, प्राचार्य, प्राध्यापक यांना मार्गदर्शन करण्यासाठी येत्या शुक्रवारी ३० जून रोजी ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी दिली.

केंद्र सरकारने लागू केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाबाबत अद्यापही संदीग्धता आहे. हे धोरण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहे. तसेच, शिक्षण संस्था, शिक्षक हे धोरण राबविण्यात अग्रेसर असणार आहेत. या सर्व घटकांना मार्गदर्शन आणि या धोरणाबाबतची माहिती सुस्पष्ट होण्याच्या दृष्टीकोनातून ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. नॅक, आयसीएसएसआर आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत नवीन शिक्षण धोरणाची आखणी करणारे शिक्षण तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. या परिषदेचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते करण्यात येणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, शिक्षण सचिव रस्तोगी, कुलगुरु डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरु डॉ. अजय भामरे आदी उपस्थित राहणार आहेत.



दरम्यान, या परिषदेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहसेक्रेटरी डॉ. मंजू सिंह, एसएनडीटीच्या कुलगुरु डॉ. उज्ज्वला चक्रदेव, मा. खा. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, डॉ. नितीन करमळकर , डॉ. शोभना वासुदेवन, डॉ. अभय पेठे, डॉ. सरीत अग्रवाल, प्रसाद प्रधान, डॉ. देवेंदर कावडे आदी शिक्षणतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेला देशभरातील प्राचार्य, शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, प्राध्यापक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. भगुरे यांनी केले आहे.

ठाणेवैभव २ ठाणे, बुधवार २८ जून २०२३

# ज्ञानसाधना महाविद्यालयात अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जागृती



**ठाणे:** अफगाणिस्तान, पाकिस्तान यांसारखे आतंकवादाला प्रोत्साहन देणारे देश भारतातील तरुणाईला या व्यसनाच्या जाळ्यात अडकविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. भारतातील सजग नसलेला तरुण अनवधानाने किंवा वाईट संगतीमुळे अंमली पदार्थांच्या व्यसनाला बळी पडतो. त्यामुळे आजच्या तरुणांना यासंदर्भात सजग करणे महत्त्वाचे ठरते, असे प्रतिपादन ठाणे शहराच्या अमली पदार्थ विरोधी पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे यांनी केले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. ठाणे शहरातील अंमली पदार्थ विरोधी पथकाद्वारे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान 19 जून ते 26 जून 2023 या कालावधी राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत ठाणे शहरातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 23 जून रोजी विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थ विरोधी जनजागृती करण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश भगूरे अध्यक्षस्थानी विराजमान होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे, हवालदार वैष्णवी परांजपे, उपप्राचार्य प्रा.सीताराम वाहुळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्यांनी अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या आयोजनाची आवश्यकता व्यक्त केली, तसेच तरुणाईचे प्रबोधन करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या अभियानात महाविद्यालयाचे सर्वतोपरी साहाय्य असेल, अशी ग्वाही दिली.

तरुणांनी चित्रपटांमधील ड्रॅग्ज घेणाऱ्या आपल्या आदर्शांचे अनुकरण करु नये, त्यातील चित्रित दृश्ये वास्तविक नसतात, उलट ती कलावंत मंडळी वास्तविक जीवनात आपले आरोग्य काळजीपूर्वक जपताना दिसतात. आभासी जग आणि वास्तविक जीवनशैली यामधील तफावत प्रचंड मोठी आहे, हे तरुण वर्गाने समजून घेणे गरजेचे आहे, अशी भावना निलेश मोरे यांनी व्यक्त केली. सदर कार्यक्रमात एनसीसी, एन.एस.एस, सिव्हिल डिफेन्स आणि कला शाखेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या नियोजनात डॉ.राधिका मुखर्जी, डॉ.बाबासाहेब कांबळे, प्रा.शंकर झंजे, प्रा. दिलीप वसावे, प्रा.विद्या चव्हाण प्रा.हरेश्वर भोये, प्रा.महेश कुलसंगे, प्रा.अतुल पाटील, प्रा.परिमल पाखरे यांनी मोलाची भूमिका निभावली. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश भगुरे; उपप्राचार्य प्रा. सीताराम वाहुळे यांच्या अमोल मार्गदर्शनाखाली पार पडला.

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । शुक्रवार, ३० जून २०२३

# 'ज्ञानसाधना'त आज शिक्षण परिषद

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याचे जाहीर केले आहे. या शैक्षणिक धोरणासंदर्भात शिक्षण संस्था, प्राचार्य, प्राध्यापक यांना मार्गदर्शन करण्यासाठी ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद ३० जून रोजी, सकाळी १० वाजता, डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे होईल, अशी माहिती माहिती सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी दिली. 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस' या कार्यक्रमाचे मीडिया पार्टनर आहे.

केंद्र सरकारने लागू केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाबाबत अद्यापही संदिग्धता आहे. हे धोरण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहे. तसेच, शिक्षण संस्था, शिक्षक यांना हे धोरण राबविण्यात अग्रेसर असणार आहेत. या सर्व घटकांना मार्गदर्शन आणि या धोरणाबाबतची माहिती सुस्पष्ट होण्याच्या दृष्टिकोनातून ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. नॅक, आयसीएसएसआर आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात

### नवीन शिक्षण धोरणाबाबत चर्चा आणि मार्गदर्शन



महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

आली आहे. या परिषदेत नवीन शिक्षण धोरणाची आखणी करणारे शिक्षण तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. या परिषदेचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते करण्यात येणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण सचिव रस्तोगी, कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरु डॉ. अजय भामरे आदी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, या परिषदेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहसचिव डॉ. मंजू सिंह, एसएनडीटीच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव, आयसीएसएसआरचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, डॉ. नितीन करमळकर, डॉ. शोभना वासुदेवन, डॉ. अभय पेठे, डॉ. सरीत अग्रवाल, प्रसाद प्रधान, डॉ. देवेंदर कावडे आदी शिक्षणतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेला देशभरातील प्राचार्य, शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, प्राध्यापक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. भगुरे यांनी केले आहे.

या राष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक असून, अधिक माहितीसाठी कॉलेजच्या www.dnyanasadhanacollege.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच, परिषदेचे संयोजक डॉ. अनिता दक्षिणा, डॉ. श्रद्धा भोमे आणि सुयश प्रधान यांच्याशी ८४५४०८३५४९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । शनिवार, १ जुलै २०२३ ।

# पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांचे प्रमाण ५० टक्क्यांवर नेणार

## उच्च व तंत्र शिक्षण प्रधान सचिव रस्तोगी यांचे प्रतिपादन

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

म. टा. प्रतिनिधी, मुंबई/ठाणे

राज्यातील विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर उच्च शिक्षणात प्रवेशाचे प्रमाण ३४ टक्के आहे. हे प्रमाण ५० टक्क्यांवर घेऊन जाण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी राज्यातील कॉलेजांमध्ये पुरेशा जागा उपलब्ध आहेत. मात्र विद्यार्थ्यांचा पदव्युत्तर

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर

उच्च शिक्षणाकडे कल नसल्याचे दिसत असून त्यांना या प्रवाहात आणण्यावर भर दिला जाणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी केले.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाबाबत (एनईपी) शिक्षण संस्था, प्राचार्य, प्राध्यापक यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'चांगल्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थांमधील सकारात्मक बदल - नवीन राष्ट्रीय धोरण २०२०' विषयावर सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे शुक्रवारी करण्यात आले होते. यावेळी रस्तोगी बोलत होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या. आमदार निरंजन डावखरे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे, नॅकचे सल्लागार देवेंद्र कवडे, संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, प्रसाद प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे उपस्थित होते. 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस' या कार्यक्रमाचे मीडिया पार्टनर होता.

'तरुणांना उच्च शिक्षण घेऊन नोकरी मिळेल की नाही याची शाश्वती नसल्याने ते याकडे वळत नाहीत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची गरज आहे. त्यासाठी राज्याने कॉलेजांच्या नॅक मूल्यांकनावर भर दिला असून आपण देशात पहिल्या क्रमांकावर आहोत,' असेही रस्तोगी यांनी नमूद केले.

'क्रमिक विषयांतील शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात होते तर कौशल्यावर आधारित शिक्षणाला दुय्यम स्थान दिले होते. या राष्ट्रीय शिक्षण धोरणात मात्र कौशल्य शिक्षणालाही तितकेच महत्त्व दिले आहे, अशी माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिव डॉ. मंजू सिंग यांनी दिली.

राष्ट्रीय शिक्षण धोरण पाच स्तंभांवर आधारित आहे. उच्च शिक्षणाने भविष्यात समाजाला आवश्यक असणारे कौशल्य निर्माण केले पाहिजे, असे मत प्रा. सरिता अग्रवाल यांनी व्यक्त केले. 'संशोधन निधी, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, कल्पना, मूल्य आणि व्यावसायिक अभ्यासक्रम' या विषयावर मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापिका डॉ. किन्नरी ठक्कर व प्रा.डॉ. मंदार भानुसे यांनी मार्गदर्शन केले.



नवीन शिक्षण धोरणासंदर्भात आपले विचार मांडताना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी.

### प्राध्यापकांकडून विविध प्रश्न

या धोरणाची अंमलबजावणी करताना समोर असलेल्या आव्हांनाचा पाढाही परिषदेत विविध कॉलेजांनी मांडला. यावेळी पायाभूत सुविधांपासून शिक्षकांची कमतरता, तसेच विद्यार्थ्यांना कॉलेजमधून अभ्यासक्रम निवडताना येणाऱ्या अडचणींबाबत प्राध्यापकांनी प्रश्न उपस्थित केले.

### चर्चा व्हायला हवी

गेल्या २० ते ३० वर्षांत शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. तंत्रज्ञानाचा वाढता वापर, विद्यार्थ्यांचा सहभाग, बहुशाखीय शिक्षण हे बदल लक्षात घेऊन नवीन शिक्षण धोरणावर चर्चा व्हायला हवी. अनेक शाळा, कॉलेज खूप जुनी आहेत. त्यामध्ये साचेबंद शिक्षण दिले जाते. त्यांमध्ये नवीन शिक्षण धोरण राबवताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. तथापि हे धोरण देशाला व समाजाला पुढे घेऊन जाईल. त्यामुळे त्याची अंमलबजावणी आवश्यक आहे, असे गोऱ्हे यांनी नमूद केले.

सकाळ
मुंबई, शनिवार, १ जुलै २०२३

शिक्षण विभाग

विधान परिषदेत सविस्तर चर्चा करणार असल्याची डॉ. नीलम गोऱ्हे यांची माहिती

# शाश्वत विकास आराखड्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाचे

ठाणे, ता. ३० : संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास आराखड्यामधील सार्वजनिक शिक्षण विषयावर आधारित नवीन शैक्षणिक धोरण आहे. हे अत्यंत महत्त्वाचे धोरण असून यामुळे समाजातील मूल्य अधिक दृढ होण्यासाठी मदत होणार आहे आणि विकासाची गती आणखीन जलद होणार आहे. त्यामुळे या धोरणाची माहिती लोकप्रतिनिधींना व्हावी, यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात विधानपरिषदेत विशेष चर्चा करण्यात येणार असल्याचे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी सांगितले.



ठाणे : शिक्षण परिषदेत डॉ. गोऱ्हे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.

## देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका

नवीन शैक्षणिक धोरण हे शाश्वत विकास आराखडामधील मुद्दा क्र ७ सार्वजनिक शिक्षण विषयावर आहे. विकासाच्या प्रक्रियेत सर्वांचा सहभाग हे युनोचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी हे नवीन धोरण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे देशाच्या विकासात नवीन शैक्षणिक धोरणाची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. शैक्षणिक संस्थांमधील प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचनेचाही समावेश या धोरणात आहे. गेल्या वीस ते तीस वर्षांत देशाच्या शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. तंत्रज्ञानाचा वाढता वापर, विद्यार्थ्यांचा सहभाग, बहुशाखीय शिक्षण असे झालेले बदल लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणावर चर्चा व्हायला हवी, असेही डॉ. निलम गोऱ्हे यांनी सांगितले.

ज्ञानसाधना ठाणे संस्थेच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, राष्ट्रीय मूल्यांकन परिषद, सामाजिक शास्त्र संशोधन संस्था व मुंबई विद्यापीठाच्या वतीने घाणेकर नाट्यगृहात आयोजित 'चांगल्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थांमधील सकारात्मक बदल : नवीन राष्ट्रीय धोरण २०२०' विषयावरील परिषदेच्या उद्घाटन समारंभात डॉ. गोऱ्हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या.

या वेळी आमदार निरंजन डावखरे, राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, स्व. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु संजीव सोनवणे, नॅकचे सल्लागार देवेंद्र कवडे, शामसुंदर पाटील, संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, मानसी प्रधान, प्रसाद प्रधान, राजीव प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, सतीश शेठ, अश्विनी कोतवाल, स्वाती साठे आदी या वेळी उपस्थित होते.

देशात अनेक शाळा कॉलेजेस हे खूप जुनी आहेत. या कॉलेज व शाळांमध्ये नवीन शैक्षणिक ध
राबवताना अनेक समस्यांना स
जावे लागणार आहे. तथापि हे ध
देशाला व समाजाला पुढे घेवून जा
त्यामुळे या धोरणाची महारा
अंमलबजावणी करणे आवश्यक अ
हे अत्यंत महत्त्वाचे धोरण असल्या
चांगल्या शिक्षण व्यवस्थेसाठी
धोरणाच्या अंमलबजावणीत शि
संस्था तसेच नागरिकांचाही सह
आवश्यक असल्याचे गोऱ्हे
सांगितले. या वेळी आमदार डाव
विकास रस्तोगी यांनीही मनोगत व
केले. सुयेश प्रधान यांनी स्वागत के

पुण्यनगरी
रविवार, २ जुलै २०२३

# येत्या अधिवेशनात नवीन शैक्षणिक धोरणावर चर्चा करणार

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे सूतोवाच

**ठाणे** : नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती लोकप्रतिनिधींना होण्यासाठी तसेच त्यावर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाच्या येत्या विधान परिषदेत नवीन शैक्षणिक धोरणावर विशेष चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शुक्रवारी येथे दिली.

ज्ञानसाधना ठाणे संस्थेच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, राष्ट्रीय मूल्यांकन परिषद, सामाजिक शास्त्र संशोधन संस्था व मुंबई विद्यापीठाच्या वतीने डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात आयोजित 'चांगल्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थांमधील सकारात्मक बदल - नवीन राष्ट्रीय धोरण २०२०' विषयावरील परिषदेच्या उद्घाटन समारंभात डॉ.गोऱ्हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या. या वेळी स्व. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे, नॅकचे सल्लागार देवेंद्र कवडे, संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, मानसी प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्यासह अन्य उपस्थित होते.



गेल्या काही वर्षांत देशाच्या शिक्षणक्षेत्रात अनेक बदल झाले. तंत्रज्ञानाचा वाढता वापर, विद्यार्थ्यांचा सहभाग, बहुशाखीय शिक्षण यांसारखे झालेले बदल लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीत शिक्षण संस्थांसह नागरिकांचाही सहभाग आवश्यक असल्याचे मत डॉ.गोऱ्हे यांनी व्यक्त केले. आजच्या चर्चासत्रातून निघणारे निष्कर्ष हे आमच्याकडे पाठवल्यास राज्यात या धोरणाची अंमलबजावणी करताना त्याचा उपयोग होईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले. यंदाच्या वर्षापासून स्वायत्त शिक्षण संस्था तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षणामध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली असून, पुढील वर्षी सर्वच महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण लागू होणार आहे. अशी माहिती या वेळी राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांनी दिली.

लोकसत्ता
२५ जुलै २०२३

SATISH PRADHAN LIBRARY * THANE

# पात्रता गुणांमध्ये घट

## अकरावीसाठी ५३ हजार ५८० विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई महानगरक्षेत्रात अकरावी प्रवेशासाठी विशेष प्रवेश फेरी राबविण्यात येत आहे. तिसऱ्या प्रवेश यादीअंतर्गत प्रवेश पात्रता गुण हे ९५ टक्क्यांच्या पार पोहोचले होते. त्यामुळे पहिल्या विशेष प्रवेश फेरीत प्रवेश पात्रता गुणांमध्ये घट होण्याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. पहिल्या विशेष प्रवेश फेरीत नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठीच्या कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या प्रवेश पात्रता गुणांमध्ये मोठ्या प्रमाणात म्हणजेच तब्बल ५ ते १० टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

पहिली विशेष प्रवेश यादी सोमवारी रोजी सकाळी १० वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात आली. पहिल्या विशेष प्रवेश यादीअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या १ लाख ७७ हजार ९१२ जागांसाठी एकूण ९३ हजार २०२ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी ८० हजार ३९ विद्यार्थ्यांना महाविद्यालय देण्यात आले. त्यातील ५३ हजार ५८० विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय, १० हजार ८९६ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीक्रमाचे आणि ५ हजार ६१६ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे.

पुढील प्रक्रिया कशी कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे केले जात आहेत. विद्यार्थ्यांना स्वतःच्या लॉगिनमध्ये जाऊन कोणते कनिष्ठ महाविद्यालय अलॉट झाले की नाही, हे पाहता येईल. सदर पहिल्या विशेष प्रवेश यादीत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना सोमवार, २४ जुलै (सकाळी १० पासून) ते गुरुवार, २७ जुलै (सायंकाळी ६ वाजेपर्यंत) या कालावधीत प्रवेश निश्चित करायचा आहे. पहिल्या विशेष फेरीच्या वेळापत्रकानुसारच कोट्यांतर्गत आणि द्विलक्षी विषयासाठी प्रवेश घेता येणार आहेत. संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास विद्यार्थ्यांनी स्वतःच्या लॉगिनमध्ये जाऊन 'प्रोसिड फॉर ॲडमिशन' या पर्यायावर क्लिक करून ऑनलाइन पद्धतीने प्रवेश निश्चित करायचा आहे. विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले असल्यास त्यांनी प्रवेश निश्चित करणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्यांना पसंतीक्रमानुसार २ ते १० क्रमांकामधील कोणतेही कनिष्ठ महाविद्यालय मिळाले असल्यास आणि संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश हवा असल्यास वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या कालावधीत आपला ऑनलाइन प्रवेश निश्चित करायचा आहे.

### पहिली विशेष प्रवेश यादी

**विशेष फेरीत शाखानिहाय उपलब्ध जागा आणि निवड झालेले विद्यार्थी**

| शाखा | उपलब्ध जागा | अर्ज केलेले विद्यार्थी | निवड झालेले विद्यार्थी |
|---|---|---|---|
| कला | २५ हजार ३७२ | ६ हजार ९५२ | ६ हजार ६८५ |
| वाणिज्य | ९५ हजार ६६७ | ४९ हजार ३४ | ४२ हजार ४४७ |
| विज्ञान | ५३ हजार ८०८ | ३६ हजार ४६२ | ३० हजार १८९ |
| व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम | ३ हजार ६५ | ७५४ | ७१८ |
| एकूण | १ लाख ७७ हजार ९१२ | ९३ हजार २०२ | ८० हजार ३९ |

*(तिसऱ्या नियमित प्रवेश फेरीतील प्रवेश पात्रता गुण कंसात)*

- एच. आर महाविद्यालय, चर्चगेट : वाणिज्य शाखा ९४.४० टक्के (९८.२०टक्के)
- सेंट झेविअर्स महाविद्यालय, फोर्ट : कला शाखा ९३.०० टक्के (९६.०० टक्के), वाणिज्य शाखा ८६.४० टक्के (८८.६० टक्के), विज्ञान शाखा ८७.४० टक्के (९२.६० टक्के)
- के. सी. महाविद्यालय, चर्चगेट : कला शाखा ६८.०० टक्के (९५.४० टक्के), वाणिज्य शाखा ८९.८० टक्के (९५.६० टक्के), विज्ञान शाखा ७७.४० टक्के (९५.८० टक्के)
- जय हिंद महाविद्यालय, चर्चगेट : कला शाखा ७५.६० टक्के (९२.०० टक्के), वाणिज्य शाखा ९०.२० टक्के (९७.४० टक्के), विज्ञान शाखा ७४.६० टक्के (९७.६० टक्के)
- रुईया महाविद्यालय, माटुंगा : कला शाखा ७१.०० टक्के (९२.४० टक्के), विज्ञान शाखा ८५.२० टक्के (९६.२० टक्के)
- पोदार महाविद्यालय, माटुंगा : वाणिज्य शाखा ८४.०० टक्के (९७.०० टक्के)
- रुपारेल महाविद्यालय, माटुंगा : कला शाखा ७७.०० टक्के (८७.६० टक्के), वाणिज्य शाखा ८२.८० टक्के (८९.४० टक्के), विज्ञान शाखा ८२.०० टक्के (९१.२० टक्के)
- एस.आय.इ.एस महाविद्यालय, शीव : वाणिज्य शाखा ८२.६० टक्के (८५.६० टक्के)
- साठ्ये महाविद्यालय, विलेपार्ले : कला शाखा ७२.४० टक्के (८०.८० टक्के), वाणिज्य शाखा ७९.४० टक्के (८८.०० टक्के), विज्ञान शाखा ७८.६० टक्के (९१.४० टक्के)
- डहाणूकर महाविद्यालय, विलेपार्ले : वाणिज्य शाखा ८०.२० टक्के (९०.०० टक्के)
- भवन्स महाविद्यालय, अंधेरी : कला शाखा ७६.४० टक्के (७७.८० टक्के), वाणिज्य शाखा ८२.२० टक्के (८७.६० टक्के), विज्ञान शाखा ७९.४० टक्के (८७.०० टक्के)
- मिठीबाई महाविद्यालय, विलेपार्ले : कला शाखा ८४.६० टक्के (८७.२० टक्के), वाणिज्य शाखा ९०.०० टक्के (९१.२० टक्के), विज्ञान शाखा ७७.६० टक्के (९०.२० टक्के)
- एन. एम. महाविद्यालय, विलेपार्ले : वाणिज्य शाखा ९०.८० टक्के (९५.६० टक्के)
- वझे केळकर महाविद्यालय, मुलुंड : कला शाखा ७०.२० टक्के (९१.०० टक्के), वाणिज्य शाखा ८६.६० टक्के (९२.६० टक्के), विज्ञान शाखा ९१.२० टक्के (९४.६० टक्के)
- मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड : वाणिज्य शाखा ८४.२० टक्के (९२.६० टक्के)
- बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे : विज्ञान शाखा ८८.२० टक्के (९२.६० टक्के)
- सी. एच. एम महाविद्यालय, उल्हासनगर : कला शाखा ५५.८० टक्के (७४.४० टक्के), वाणिज्य शाखा ७९.६० टक्के (८०.६० टक्के), विज्ञान शाखा ८७.४० टक्के (९४.६० टक्के)
- फादर अग्नेल मल्टीपर्पज महाविद्यालय, वाशी : वाणिज्य शाखा ८५.४० टक्के (८६.२० टक्के), विज्ञान शाखा ९१.८० टक्के
- सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे : कला शाखा ४८.०० टक्के (७१.६० टक्के), वाणिज्य शाखा ६६.४० टक्के (७४.६० टक्के), विज्ञान शाखा ७५.२० टक्के (८१.६० टक्के)
- बी. के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण : कला शाखा ४८.०० टक्के (८६.४० टक्के), वाणिज्य शाखा ७८.२० टक्के (८७.४० टक्के), विज्ञान शाखा ८५.०० टक्के (९४.८० टक्के)

सामना
२५ जुलै २०२३

सामना

# १३ हजार विद्यार्थी वेटिंगवर

## अकरावीच्या विशेष फेरीत ८०,०३९ विद्यार्थ्यांना प्रवेश

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) – अकरावी ऑनलाइन प्रवेशाची विशेष फेरी १ सोमवारी जाहीर झाली. या फेरीत प्रवेशासाठी ९३ हजार २०२ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता, त्यापैकी ८० हजार ३९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. त्यामुळे अद्याप १३ हजार १६३ विद्यार्थी वेटिंगवरच आहेत. या फेरीत पहिल्या पसंतीचे कॉलेज अलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे बंधनकारक आहे.

पहिल्या विशेष फेरीसाठी एकूण १ लाख ७७ हजार ९१२ जागा उपलब्ध होत्या त्यापैकी ८० हजार ३९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. मुंबई विभागात अकरावीच्या जागा उपलब्ध असून विशेष फेरीच्या प्रवेशानंतरही सुमारे ९७ हजार ८७३ किंवा त्यापेक्षा जास्त जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे. विशेष फेरीतील विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी २७ जुलै सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

**शाखानिहाय प्रवेश**

| शाखा | उपलब्ध जागा | अर्ज केलेले विद्यार्थी | प्रवेश मिळाले |
|---|---|---|---|
| आर्टस् | २५,३७२ | ६९५२ | ६६८५ |
| कॉमर्स | ९५,६६७ | ४९,०३४ | ४२,४४७ |
| सायन्स | ५३,८०८ | ३६,४६२ | ३०,१८९ |
| एचसीव्हीसी | ३०६५ | ७५४ | ७१८ |
| एकूण | १,७७,९१२ | ९३,२०२ | ८०,०३९ |

### कटऑफ आला खाली

अकरावीच्या मागील यादीत वाढलेला कॉलेज कटऑफ काही अपवाद वगळता खाली आला आहे. सायन्स शाखेपेक्षा आणि आर्टस् आणि कॉमर्सच्या कटऑफमध्ये घट झाली आहे. बहुसंख्या कॉलेजचा कटऑफ ७५ टक्क्यांवर आहे. काही कॉलेजांचे अपवाद वगळता एचआर कॉमर्स, झेवियर्स आर्टस, मिठीबाई कॉमर्स, एनएम कॉमर्स, वझे केळकर सायन्स कॉलेजच्या कटऑफमध्ये घट झाली आहे.

### विशेष फेरी १ चे कटऑफ

- एचआर – कॉमर्स ९४.४
- झेवियर्स – आर्टस् ९३, कॉमर्स ८६.४, सायन्स ८७.४
- केसी – आर्टस् ६८, कॉमर्स ८९.८, सायन्स ७७.४
- जयहिंद – आर्टस् ७५.६, कॉमर्स ९०.२, सायन्स ७४.६
- रूईया – आर्टस् ७१, सायन्स ८५.२
- पोदार – कॉमर्स ८४
- रूपारेल – आर्टस् ७७, कॉमर्स ८२.८, सायन्स ८२
- एसआयईएस – कॉमर्स ८२.६
- साठये – आर्टस् ७२.४, कॉमर्स ७९.४, सायन्स ७८.६
- डहाणूकर – कॉमर्स ८०.२
- भवन्स – आर्टस् ७६.४, कॉमर्स ८२.२, सायन्स ७९.४
- मिठीबाई – ८४.६, कॉमर्स ९०, सायन्स ७७.६
- एनएम – कॉमर्स ९०.८
- वझे-केळकर – आर्टस् ७०.२, कॉमर्स ८६.६, सायन्स ९१.२
- मुलुंड कॉलेज – कॉमर्स ८४.२
- बांदोडकर – आर्टस् ८८.२
- सीएचएम – आर्टस् ५५.८, कॉमर्स ७९.६, सायन्स ८७.४
- फादर अॅग्नेल – कॉमर्स ८५.४, सायन्स ९१.८
- ज्ञानसाधना – आर्टस् ४८, कॉमर्स ६६.४, सायन्स ७५.२
- बिर्ला – आर्टस् ४८, कॉमर्स ७८.२, सायन्स ८५

पुण्य नगरी

मंगळवार, १ ऑगस्ट २०२३ । ठाणे

# ठाणेकरांना मिळाला वाहतूक कोंडीतून देखणा दिलासा



## ज्ञानसाधना महाविद्यालयासमोरील भुयारी मार्ग अखेर वाहतुकीसाठी खुला

। ठाणे : कोपरी ते तीन हात नाका तसेच भास्कर कॉलनी ते ज्ञानसाधना महाविद्यालय अशा अतिशय वर्दळीच्या मार्गावरील वाहतूक सुरळीत करणारा पूर्व द्रुतगती महामार्गाखालील भुयारी मार्ग (अंडर पास) सोमवारी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या भुयारी मार्गासाठी नागरिकांनी केलेली पाच वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे.

ज्ञानसाधना महाविद्यालयाचे विद्यार्थी, तसेच कोपरीकडून तीन हात नाका येथे येणाऱ्या वाहनांना या भुयारी मार्गाचा वापर करता येणार आहे. त्यामुळे मल्हार सिनेमा, हरी निवास या भागावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल. कोपरी, आनंदनगर, बारा बंगला, ज्ञानसाधना महाविद्यालय, मनोरुग्णालय या भागात ये-जा करण्यासाठी तीन हात नाका या अत्यंत वर्दळीच्या मार्गाने वाहतूक करावी लागत होती. तीन हात नाका येथे गर्दीच्या वेळी प्रतितास १३ हजार वाहने ये-जा करतात. त्यामुळेच कोपरी येथील रेल्वेवरील पुलाचे रुंदीकरण आणि बांधकाम या अंतर्गत ज्ञानसाधना महाविद्यालय येथे भुयारी मार्गाचे (अंडर पास) काम 'एमएमआरडीए'ने हाती घेतले होते. त्यासाठी सुमारे ६ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.



छाया : सचिन देशमाने

या मार्गामुळे शहराच्या दोन्ही भागांत वाहतूक करण्यासाठी चांगली सुविधा निर्माण झाली आहे. त्याचा फायदा बारा बंगला, कोपरी, आनंदनगर, मनोरुग्णालय परिसर यांना होणार आहे. तसेच तीन हात नाका येथील वर्दळही काही प्रमाणात कमी होणार आहे. या भुयारी मार्गातील सुशोभीकरण ठाणे महानगरपालिकेने केले आहे. या मार्गात दोन्ही बाजूंना अतिशय देखणे आणि सुबक असे थ्री डी रंगकाम करण्यात आले आहे. त्यामुळे या परिसराला एक वेगळेच रूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे नागरिकांना सुखद अनुभव मिळणार आहे.

### असा आहे भुयारी मार्ग

- भुयारी मार्गाच्या कामाचे आदेश एप्रिल २०१८ मध्ये देण्यात आले होते. त्याचे बांधकाम जुलै २०२३ मध्ये पूर्ण करण्यात आले.
- या मार्गाची लांबी ३६.७५ मीटर एवढी आहे. तर रुंदी २१.२० मीटर एवढी आहे. त्यात चार मार्गिका आणि फुटपाथ यांचा समावेश आहे. तसेच उंची ४ मीटर आहे. त्यामुळे हा मार्ग सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांसाठी आणि बसेससाठी वापरता येणार आहे.
- या मार्गाचे काम अत्युच्च दर्जाचे व्हावे, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार, पुलाखालील रस्ता मास्टिक पद्धतीने, तर त्याचे पोहोच मार्ग काँक्रीटीकरणाने तयार करण्यात आले आहेत.

लोकमत

मुंबई, मंगळवार, दि. १ ऑगस्ट २०२३

# भुयारी मार्ग खुला, ठाणेकरांची वाहतूक कोंडीतून होणार सुटका



१ कोपरी ते तीन हात नाका, तसेच भास्कर कॉलनी ते ज्ञानसाधना महाविद्यालय अशा अतिशय वर्दळीच्या मार्गावरील वाहतूक सुरळीत करणारा पूर्व द्रुतगती महामार्गाखालील भुयारी मार्ग (अंडर पास) सोमवारी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. यामुळे नागरिकांची पाच वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे. त्यामुळे मल्हार सिनेमा, हरी निवास या भागावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल.

२ तीन हात नाका येथे गर्दीच्या वेळी प्रति तास १३ हजार वाहने ये-जा करतात. भुयारी मार्गाचे (अंडर पास) काम एमएमआरडीएने हाती घेतले होते. त्यासाठी सुमारे ६ कोटी रुपये खर्च केले आहेत. या मार्गामुळे शहराच्या दोन्ही भागांत वाहतूक करण्यासाठी चांगली सुविधा निर्माण झाली आहे. त्याचा फायदा बारा बंगला, कोपरी, आनंदनगर, मनोरुग्णालय परिसर यांना होणार आहे, तसेच तीन हात नाका येथील वर्दळही काही प्रमाणात कमी होणार आहे.

सकाळ , मंगळवार, १ ऑगस्ट २०२३

# तीन हात नाक्याचा भार हलका

## भुयारी मार्गाचा पर्याय; ठाणे पूर्व ते मुलुंड प्रवास १० मिनिटांत

सकाळ वृत्तसेवा

ठाणे, ता. ३१ : ठाण्याहून मुलुंड पश्चिममार्गे मुंबई गाठण्यासाठी तीन हात नाका सिग्नलचा येणारा अडथळा आता दूर होणार आहे. ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळ एमएसआरडीएने बांधलेल्या भुयारी मार्गाचा पर्याय या मार्गावरील प्रवाशांसाठी उपलब्ध झाला आहे. या सुमारे ३६.७५ मीटर आणि २१.२० मीटर रुंद असलेल्या या चौपदरी भुयारी मार्गातून छोटी वाहने आणि बस धावणार आहेत. त्यामुळे कोपरी पूर्व ते मुलुंड मॉडेला चेकनाका असा प्रवास अवघ्या १० मिनिटांवर येणार आहे. पर्यायाने तीन हात नाक्यावरील भार हलका होण्यासही मदत होणार आहे.

तीन हात नाका हा ठाणे शहरातील सर्वात गजबजलेला भाग असून या ठिकाणच्या सहा रस्त्यांवर सिग्नल यंत्रणा कार्यान्वित आहे. दररोज लाखो वाहने येथून ये-जा करत असल्याने येथे कायम वाहतूककोंडी होत असते. त्यातून मार्ग काढताना प्रत्येक वाहनाची किमान तीन ते चार मिनिटे खर्ची पडतात. कधी कधी हा विलंब १० ते १५ मिनिटांपर्यंतही जातो. त्यामुळे ही कोंडी फोडण्यासाठी गेली अनेक वर्षे प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार ट्रिपल डेकर उड्डाणपुलापासून ते ग्रेड सेपरेटर अशा अनेक पर्यायांची चाचपणी झाली. पण त्याला यश मिळाले नाही. त्यातच कोपरी उड्डाणपुलाची मजबुती आणि रुंदीकरणाचे काम एमएसआयडीएने हाती घेतले. यावेळी कोपरी पूर्व ते मुलुंड पश्चिम चेकनाकापर्यंत भुयारी मार्ग उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

भुयारी मार्गाच्या कामाचा २०१८ साली कार्यादेश काढण्यात आला. त्याचे काम जुलै २०२३ मध्ये पूर्ण झाले आहे. या भुयारी मार्गाची लांबी ३६.७५ मीटर इतकी आहे. तर रुंदी २१.२० मीटर आहे. चार मार्गिका आणि फुटपाथ अशी या भुयारी मार्गाची रचना आहे. विशेष म्हणजे या भुयारी मार्गातून ४ मीटर उंचीच्या हलक्या वाहनांसह परिवहनच्या बसही धावणार आहेत. त्यामुळे कोपरीसह ठाणे पूर्व भागातून मुलुंड दिशेला जाणाऱ्या वाहनांना यापुढे तीन हात नाक्यापर्यंत येण्याची किंवा सिग्नलमुळे खोळंबण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे खर्ची होणारा अर्धा ते पाऊण तासांचा वेळ आणि इंधनाचीही बचत होणार आहे.



**ठाणे :** भुयारी मार्गाचे सुशोभिकरण महापालिकेने केले असून दोन्ही बाजूने अतिशय देखणे थ्री डी रंगकाम केले आहे. त्यामुळे परिसराला आकर्षक स्वरुप प्राप्त झाले आहे. (छायाचित्र : दीपक कुरकुंडे)

### मुख्यमंत्र्यांशिवायच मार्ग खुला

बारा बंगला, कोपरी, आनंदनगर, मनोरुग्णालय परिसराला दिलासा देणारा हा भुयारी मार्ग अखेर सोमवारी खुला करण्यात आला. वास्तविक सुरुवातीला या मार्गाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्याचे नियोजन होते. मात्र दोन वेळा वेळ दिल्यानंतरही प्रकृती अस्वस्थतेमुळे ते हजर राहू शकले नसल्याने नियोजनानुसार पालिकेने हा भुयारी मार्ग अखेर खुला केला आहे.

### सिग्नलपासून मुक्ती

तीन हात नाकाचा सिग्नल म्हणजे वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. मात्र या भुयारी मार्गामुळे ठाणे पूर्व ते मुलुंड पश्चिम दिशेला जाणाऱ्या वाहनांना सिग्नलपासून मुक्ती मिळणार आहे. याशिवाय ज्ञानसाधना महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना यापूर्वी घालावा लागणारा वळसा टळणार आहे. ब्राह्मण सोसायटी, गोखले रोड, विष्णू नगर या भागातील रहिवाशांनाही या भुयारी मार्गाचा वापर करता येणार आहे.

ठाणेवैभव ६ ठाणे, मंगळवार १ ऑगस्ट २०२३

# ठाणे पूर्व ते मुलुंड प्रवास अवघ्या १० मिनिटांत होणार

## ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळील भुयारी मार्ग खुला

>>पान ६ वर





(छाया- गजानन हरिमकर)

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । गुरुवार, १२ ऑक्टोबर २०२३ ।

# आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर



## प्रगती अतकरे, अनुष्का गांगल विजेते

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात अलीकडेच पार पडलेल्या 'कै. इंदिराबाई फणसे' कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत २२ कनिष्ठ महाविद्यालयांतील ३९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

अंबरनाथ येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रगती अतकरे या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले, तर माटुंग्यातील रामनिवास रुईया क. महाविद्यालयातील अनुष्का गांगलने दुसरा क्रमांक पटकावला. ती उत्स्फूर्त पारितोषिक विजेतीही ठरली. आदर्श विद्यामंदिर, बदलापूर येथील नेत्रा शिंदे हिने तृतीय क्रमांक पटकावला. सूरज मुळ्ये (सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय,ठाणे), वैभवी किणी आणि तृप्ती भोसले(अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई), संस्कृती म्हात्रे आणि नेहा तायडे (माध्यमिक व क. महाविद्यालय, टेमघर, भिवंडी) या स्पर्धकांनी उत्तेजनार्थ पारितोषिके पटकावली.

लेखिका डॉ. अनुप्रिया खोब्रागडे कोमसापचे ठाणे जिल्हाध्यक्ष बाळ कांदळकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख आणि कवयित्री डॉ. प्रज्ञा पवार, कोमसापचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, पर्यवेक्षक प्रा. राजेंद्र वेखंडे उपस्थित होते. स्पर्धा प्रमुख प्रा.मनिषा राजपूत यांनी प्रास्ताविक केले, तर उपप्रमुख प्रा. महेश कुलसंगे यांनी आभार प्रदर्शन केले.

यंदा वक्तृत्व स्पर्धेसाठी वाचन संस्कृती लोप पावतेय का?, कृत्रिम बुद्धिमत्ता -वरदान की शाप, देशाच्या प्रगतीमधील महिलांचे योगदान, मला आवडलेला साहित्यप्रकार, राजर्षी शाहू महाराज-एक द्रष्टा राजा हे विषय निश्चित करण्यात आले होते. प्रथम पारितोषिकपात्र विजेत्याला आकर्षक फिरता स्मृतिचषक, प्रमाणपत्र, पुस्तक आणि रोख रक्कम २ हजार ५०१ रूपये, व्दितीय पारितोषिकप्राप्त विजेत्याला चषक, प्रमाणपत्र, पुस्तक आणि रोख १ हजार ५०१ रुपये, तृतीय क्रमांक विजेत्याला चषक, प्रमाणपत्र, पुस्तक आणि एक हजार रुपये रोख रक्कम तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक विजेत्यांना प्रमाणपत्र, पुस्तक आणि रोख रक्कम ७०१ रुपये देण्यात आले.

उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा पारितोषिक विजेत्यास प्रमाणपत्र, रोख ३ हजार ५०१ रुपये असे पारितोषिक देण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र आणि पुस्तक देण्यात येणार आहे.